नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | अंक - १४१ | वार सोमवार दि. ७ ऑक्टोबर २०२४ | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 2nd | Issue - 141 | Blow- Monday Date 7 October 2024 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात



### भारताने बांगलादेशचा सात विकेट्सनी उडवला धुव्वा

मुंबई : टीम इंडियाने शानदार गोलंदाजीनंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि अष्टपैलू हार्दिक पंड्या यांच्या शानदार फलंदाजीमुळे भारतीय संघाने ग्वाल्हेर येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेशचा सात विकेट्स राखून पराभव केला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९.५ षटकांत १२७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ११.५ षटकांत तीन गडी गमावून १३२ धावा करून सामना जिंकला. भारतातर्फे सर्वाधिक धावा हार्दिकने केल्या, त्याने १६ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३९ धावा केल्या. हार्दिकशिवाय कर्णधार सूर्यकुमारनेही आक्रमक फलंदाजी करत १४ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २९ धावा केल्या. पहिला सामना खेळणारा नितीश रेड्डीही १५ चेंडूत १६ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी संजू सॅमसननेही शानदार फलंदाजी केली. त्याने १९ चेंडूचा सामना करताना ६ आकर्षक चौकारांच्या मदतीने २९ धावांचे योगदान दिले होते. बांगलादेशकडून मुस्तफिजुर रहमान आणि मेहदी हसन मिराज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# केंद्रात अन् राज्यात तुमचं सरकार, मग स्मारक का झालं नाही?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : अरबी समुद्रामध्ये २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पार पडले होते. मात्र, त्यानंतर अद्यापही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम झाले नसल्यामुळे आता स्वराज्य पक्षाचे नेते, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आक्रमक झाले आहेत. आज ते स्मारकाची पाहणी करण्यासाठी मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया या ठिकाणी दाखल झाले आहेत. यावेळी त्यांना पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी काही सवाल करत सरकारवर हल्लाबोल केला. केंद्रात तुमचं सरकार, राज्यात देखील तुमचं सरकार, स्मारकाचं जलपूजनही तुम्हीच केलं. मग स्मारक का झालं नाही?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी विचारला आहे.

### संभाजीराजे छत्रपतींचा राज्य सरकारला सवाल

आम्ही कोणतेही आंदोलन करण्यासाठी मुंबईत आलेलो नाहीत. खऱ्या अर्थाने आपल्याला अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा विषय हा राज्यातील १३ कोटी जनतेपर्यंत घेऊन जायचा आहे. कोणत्याही प्रकारे आपल्याला कायदा हातात घ्यायचा नाही. कायद्याच्या बाहेर जाऊन कोणतीही गोष्ट आपल्याला करायची नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केलं. ते आपले गडकोट किल्ले व्यवस्थित राहिले पाहिजे. त्यामुळे माझा १५ ते २० वर्षांपासून प्रयत्न सुरु आहे. रायगड किल्लयावर रायगड प्राधिकरण स्थापन झालं. त्यासाठी मी सरकारला भाग पाडलं. ७५ वर्षांत पहिल्यांदा



रायगड किल्लयाचं सवर्धन सुरु झालं, असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराजांचं मोठं स्मारक व्हावं ही त्यावेळी सर्व नेत्यांची इच्छा होती. २०१० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक व्हायला हवं. त्यानंतर २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीने घोषणा केली की आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक अरबी समुद्रात करणार आहेत. पुढे २०१६ मध्ये मुंबई महापालिका निवडणुकीच्या अगदी आधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते जलपूजन करण्यात आलं. पंतप्रधान मोदी ज्यावेळी जलपूजन करण्यासाठी येतात, याचा अर्थ तुमच्याकडे सर्व परवानगी आहे. त्याशिवाय देशाचे (पान २ वर...)

# भाजप महायुती ला महाराष्ट्राच्या सत्तासिंहासनावर पुन्हा बसविण्याची ताकद माझ्या रिपब्लिकन पक्षात : केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : राज्यासह देशभरात रिपाइं कार्यकर्त्यांची फार मोठी ताकद असुन भाजपला सत्तेत येण्यासाठी रिपाइंच्या ताकदीची गरज आहे. येणाऱ्या विधानसभेत भाजपाने रिपाइंला ११ जागेवर वाटा देण्याचे काम करावे. भाजप महायुतीला पुन्हा महाराष्ट्राच्या सत्तासिंहसनावर बसविण्याची ताकद माझ्या रिपब्लिकन पक्षाची आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.



तसेच राखीव मतदार संघातील जागेवर रिपाइंचा हक्क असून केजची जागा देखील रिपाइंच्या हक्काची आहे. भाजप ने केज ची जागा रिपब्लिकन पक्षाला सोडल्यास पप्पू कागदे यांना रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी देऊ असे यावेळी ना. रामदास आठवले यांनी बीड येथे जाहीर केले.

बिड जिल्हा रिपाइंच्या वतीने युवक आघाडी चे प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, यांच्या नेतृत्वात बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिंडागणावर रिपब्लिकन पक्षातर्फे केंद्रीय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांचा भव्य- दिव्य सत्कार करण्यात आला या सत्कार सोहळयातस उत्तर देताना (पान २ वर...)

# चार जिल्ह्यांत सुरु होणार फिरते पक्षाघात केंद्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पक्षाघाताचा झटका आलेल्या रुग्णाला गोल्डन अवरमध्ये उपचार मिळाल्यास त्याची प्रकृती सुधारण्याची अधिक शक्यता असते. ही बाब लक्षात घेता राज्यातील चार जिल्ह्यांमधील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये फिरते पक्षाघात केंद्र सुरू करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी ७५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. मुंबईमध्ये जे.जे. रुग्णालय, पुण्यातील बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि चंद्रपूरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पक्षाघात केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दोन केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. प्रत्येक केंद्रासाठी राज्य सरकारने १५ कोटी असे ७५ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

# नातेपुतेजवळ मोटार-टेम्पो अपघातात मायलेकासह चौघांचा मृत्यू, तिघे जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यातील नातेपुतेजवळ कारुंजे गावच्या हद्दीत मोटार आणि टेम्पो यांच्या अपघातात दोघा मायलेकासह चौघांचा मृत्यू झाला तर अन्य तिघेजण जखमी झाले. रविवारी सकाळी घडलेल्या अपघाताची नोंद नातेपुते पोलीस ठाण्यात झाली आहे.

इंदापूर तालुक्यातील लासुर्णे येथील राजेश अनिल शहा (वय ५५) यांच्यासह त्यांच्या कारखान्यातील कामगार दुर्गेश शंकर घोरपडे (वय २८), कोमल विशाल काळे (वय ३२) आणि तिचा मुलगा शिवलाल विशाल काळे (वय १०) अशी या अपघा-



तातील चौघा मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये आकाश दादा लोंढे (वय २५), पल्लवी बसवेश्वर पाटील (वय ३०) आणि अश्विनी दुर्गेश घोरपडे यांचा समावेश आहे.

मृत राजेश शहा हे आपल्या कंपनीतील कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना घेऊन सातारा जिल्ह्यातील कासपठाराच्या सहलीला निघाले होते. सकाळी त्यांनी इंदापूर सोडले होते. पुणे-पंढरपूर मार्गावरून कासपठारच्या दिशेने जात असताना, लासुर्णेपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर कारुंजे (ता. माळशिरस) गावच्या हद्दीत पुलावरून त्यांची मोटार चुकीच्या दिशेने धावत होती. तेव्हा या मोटारीची दुसऱ्या एका टेम्पोला धडक बसून हा अपघात झाला. या अपघाताची माहिती कळताच नातेपुते पोलिसांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी अपघातस्थळी दाखल झाले. जखमीवर नजीकच्या रुग्णालयात औषधोपचार सुरू आहेत.

### आयुष्याने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत ढकललं ...तरी त्यानं हार मानली नाही

# गावाच्या सामान्य पोराचा असामान्य प्रवास : सूरज चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : जेव्हा आयुष्य आपल्यावर संकटांचा डोंगर कोसळतं, तेव्हा आपण खचून जातो, तक्रारी करतो. काही जण विचार करतात, माझ्यासोबतच असं का घडतंय? पण अशा वेळेस जर का कुणीतरी आपल्या पुढे प्रेरणादायी उदाहरण म्हणून उभं राहिलं, तर आयुष्याची दिशा बदलू शकते. असाच एक प्रेरणादायी माणूस म्हणजे सूरज चव्हाण, ज्याने आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर स्वतःचं वेगळं अस्तित्व निर्माण केलं आहे.

सूरजचा जन्म एका अत्यंत गरिब कुटुंबात झाला. बालपणातच आई-वडिलांचं छत्र हरवलं. त्याच्या लहानपणापासूनच तो कष्टात वाढला. आयुष्याने त्याला इतक्या प्रतिकूल परिस्थितीत ढकललं, तरी त्यानं हार मानली नाही. सूरजकडे ना कोणतं शिक्षण होतं, ना कुठली कला. त्याने गावाबाहेरच्या माळावर जाऊन, जमतील तसे डायलॉग आणि ॲक्टिंग करून व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली. या मोडकेतोडके प्रयत्नातूनच तो मोठ्या मंचावर पोहोचला.

त्याच्या या धडपडीने त्याला अनेक संधी



दिल्या. वेब सिरीज, सिनेमा, जाहिरातींमध्ये काम मिळालं. परंतु या प्रवासात तो फसला, त्याला फसवणूक झाली. बोलण्यावरून, हावभावांवरून त्याला रोस्ट करण्यात आलं, पण त्याने कधीच हार मानली नाही. कष्ट करत राहिला, पुढं जात राहिला. त्याच्या व्हिडिओंनी लोकांना हसवलं, क्षणभर टेन्शन विसरायला लावलं, आणि शेवटी तो पोहोचला 'बिग बॉस मराठी' या मोठ्या मंचावर!

बिग बॉससारख्या कठीण रिलिटी शोमध्ये २७४ स्पर्धकांमधून अंतिम १६ मध्ये निवड होणं, हे काही साधं काम नव्हतं. घरातल्या इतर स्पर्धकांपेक्षा तो वेगळा ठरला. जेव्हा त्याच्या भाषेवरून किंवा शिक्षणावरून त्याला कमी लेखण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा त्यानं कधीच कुणाला उत्तर दिलं नाही. नम्रपणे आणि मनमिळावू स्वभावानं त्यानं सर्वांची मनं जिंकली. त्याचं हे साधं, सरळ पण प्रामाणिक व्यक्तिमत्त्व सगळ्यांना भावलं.

सूरजच्या घरातल्या वागणुकीमुळे त्याने बिग बॉसचे होस्ट रितेश देशमुख यांचीही प्रशंसा मिळवली. त्याच्या डायलॉग्सवर गाणी तयार झाली, त्याच्या एंट्रीवर महाराष्ट्रातील अनेक लोक नाचले. एवढंच नाही, तर शोचा टीआरपी वाढवण्यामध्ये सूरजचा मोठा वाटा आहे हेही सिद्ध झालं आहे. सूरजचं बिग बॉसच्या घरातलं राहणं फक्त स्पर्धा नव्हतं; ते एक प्रेरणा देणारं जीवन होतं. नॉमीनेशनला तो कधीच घाबरला नाही, कुठलंही काम करण्यासाठी लाजला नाही, आणि कुणाशीही कटुता निर्माण केली नाही. त्याचं प्रत्येक क्षणातलं कृतज्ञ असणं, त्याचं प्रामाणिकपणं हे सर्वांना त्याच्याशी जोडत राहिलं.



## संपादकीय....

### शासनाचा योग्य निर्णय

पक्षाघाताचा झटका आलेल्या रुग्णाला गोल्डन अवरमध्ये उपचार मिळाल्यास त्याची प्रकृती सुधारण्याची अधिक शक्यता असते. ही बाब लक्षात घेता राज्यातील चार जिल्ह्यांमधील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये फिरते पक्षाघात केंद्र सुरू करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी ७५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. मागील काही वर्षांपासून पक्षाघाताच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. पक्षाघाताचा झटका आलेल्या रुग्णाला वेळेवर उपचार न मिळाल्यास त्याचा मृत्यू होण्याची शक्यता असते. तसेच गोल्डन अवरमध्ये उपचार मिळाल्यास होणारा त्रास कमी होण्याची शक्यता असते. मात्र अनेक रुग्ण वेळेवर रुग्णालयात पोहचू शकत नसल्याने त्यांना दीर्घकालीन अपंगत्वाला सामोरे जावे लागते. त्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने राज्यातील चार जिल्ह्यांमधील चार वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये पाच फिरती पक्षाघात केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ती केंद्रे अद्ययावत यंत्रणांनी सज्ज असतील. मुंबईमध्ये जे.जे. रुग्णालय, पुण्यातील बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि चंद्रपूरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पक्षाघात केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दोन केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. प्रत्येक केंद्रासाठी राज्य सरकारने १५ कोटी असे ७५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या पाच फिरत्या पक्षाघात केंद्रांच्या उभारणीसाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून टर्न की पद्धतीने ती सुरू केली जातील.

# केंद्रात अन् राज्यात तुमचं सरकार, मग स्मारक का झालं नाही?

(पान १ वरून..) पंतप्रधान जलपूजनासाठी येणार नाहीत. तेव्हा मी देखील त्या ठिकाणी उपस्थित होतो. मलाही कौतुक वाटलं. मग ज्या प्रकारे सरदार वल्लभभाई पटेल यांचं स्मारक उभा राहिलं. मला तुलना करायची नाही. मात्र, २०१६ मध्ये स्मारकासाठी जलपूजन झालं आणि त्यासाठी एक समितीही स्थापन झाली. मात्र, त्यानंतर पुढे काय झालं?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी केला. ॉ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत मी देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्याशीही माझी चर्चा झाली. त्यानंतर आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही माझी चर्चा झाली. सर्वांना विचारलं की हे स्मारक का उभा राहीलं नाही? तर सर्वांचं उत्तर एकच आलं की पर्यावरणाच्या अडचणी निर्माण झाल्या आणि पुढे हा विषय न्यायालयात गेला. त्यामुळे आम्हाला काही करता येत नाही, असं सांगण्यात आलं. मग आता माझा या सरकारला प्रश्न आहे की, तुमचं केंद्रात सरकार, तुमचं राज्यात सरकार, तुम्हीच घोषणा केली, तुम्हीच स्मारकाचं जलपूजन केलं. मग स्मारक का झालं नाही?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी केला.

# नूतन गटविकास अधिकारी कदम यांचे स्वागत संचालक नीळ यांनी केली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा पंचायत समितीचे नूतन गटविकास अधिकारी डॉक्टर अमित कदम रुजू झाले होते व त्यांची स्वागत श्री कमलाई सहकारी साखर कारखान्याची संचालक सतीश यांनी केले होते. यावेळी कमलाई नगरीची संपादक जयवंत दळवी, अशोक घाडगे, ज्ञानेश्वर चितकर (ग्रामपंचायत सदस्य, गोंडवरे), सुदाम साळुंखे आदित्य करमाळा येथील सर्व उपस्थित होते.

# उध्वस्त ज्ञान पर्यावरणाची कारणे...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संस्कृती,भाषा,वंश व धर्म हे कमी जास्त स्वरूपात ज्ञानाशी निगडित असलेले महत्त्वाचे मानवी जीवनातील घटक आहेत.हे मानवी जीवनाच्या प्रत्येक गोष्टीतील राजकारणासाठी अनेक भाषिक आणि वांशिक धार्मिक बांधवांच्या विस्थापनासाठी भांडवल म्हणून या घटकांचा वापर केला जातो. तेव्हा ज्ञानाचे स्वरूप नुसते बदलत नाही तर ज्ञान आणि ज्ञान निर्माण करणाऱ्या संस्था यांची योग्यता उध्वस्त होते. या संस्थांच्या बद्दलचां संशय वाढतो व उपयुक्तता धोक्यात येते.

आधुनिकता तंत्रज्ञानामुळे गतिमान तर बनतेच पण अनाकलनीय होत राहते.आधुनिकतेच्या लाभा बरोबर मानव जातीची उपयुक्ततेची तृष्णा हाव वाढत जाते.आणि त्याच बरोबर उपलब्ध व्यवस्थांच्या मधील वास्तवात असलेल्या ज्ञान या मूल्याचे अवमूल्यन होऊ लागते ही ज्ञानाची अनु उपयुक्तता तंत्रज्ञानामुळे होते का?

ज्ञान म्हणजे तरी काय? ज्ञानाचे सतत स्वरूप बदलते का विचार कल्पना मूर्त स्वरूपाच्या निर्मितीसाठी रचनात्मक काही तर्क करणे संबोधाच्या नवनवीन मांडण्या करणे संकल्पनात्मक सिद्धांताचे स्वरूप निश्चित शब्दबद्ध करणे नवे अर्थ नवे आकलन अनेक अंगाने शब्दबद्ध करणे. वर्तमानाशी उपयुक्तता आणि निरोपियुक्तता दाखवून देणे हे ज्ञानाचे आज लावलेले अर्थ आहेत.पण प्रत्येक काळात ज्ञानाच्या उपयुक्ततेला काळाचे संदर्भ असतात साधनांचे बदलते स्वरूप आणि गतिमानता ज्ञानाची निरोपियुक्तता ठरवतो या सर्व बाबींचा आज जगभर गोंधळ चालू आहे

म्हणून प्रस्तुत लेखात ज्ञानाचे आजचे स्वरूप ज्ञानाचा अर्थ करणाशी असलेला संबंध नेमका काय आहे? उत्पादन व ग्राहक या नात्याशी ज्ञानाचा संबंध काय आहे बाजारपेठ जाहिरात आणि भांडवल यांच्यामध्ये ज्ञान किती महत्त्वाचे आहे हे सर्वच घटक एकमेकाला गौण ठरवतात का? या सर्वांच्या मधील बाजारपेठ आणि क्रयशक्ती असलेला ग्राहक हा किती महत्त्वाचा आहे. की प्रत्येक कालखंडामध्ये भांडवलांच्या गतिमान वेगामुळे बाजारीकरणाला आलेल्या अतिरेकी महत्व मुळे सर्वसामान्य नागरिकांना ज्ञानाचे महत्त्व सर्वार्थाने प्रतीत होतेच असे नाही ज्ञान निर्माण करणाऱ्या संस्था शाळा महाविद्यालय विद्यापीठे ही सुद्धा अस्थिर झाली आहेत.

गुणवत्तेच्या नावाखाली अनेक प्रकारची जाहिरात आणि संशोधकीय पेपर जाहीर करणे बाजारपेठेतील विद्यार्थ्याला पालकाला आकृष्ट करणे हे आता शिक्षण संस्थांचे काम झाले आहे. विद्यार्थी ज्ञान प्राप्त करून काय करायचे? ज्ञानामुळे मानवी मूल्य प्राप्त होतात पण मानवी मूल्यामुळे स्पर्धेच्या जगात जगण्याची संधी निश्चित मिळेलच याची खात्री देता येत नाही. असे एक निराशेचे पर्यावरण भारतीय औद्योगिक क्षेत्रात शिक्षण क्षेत्रात निर्माण झाले आहे त्यामुळे शिक्षण हे ज्ञानासाठी की तंत्रज्ञानासाठी शिक्षण हे कौशल्या साठी की उत्पादनासाठी शिक्षण हे भांडवलाच्या उपयुक्त ते साठी श्रमाच्या सहाय्यभूत बाबीसाठी याचा आता विचार होऊ लागला आहे .भांडवलाच्या अनुषंगाने तंत्रज्ञानाच्या गतिमान वापरासाठी वेगवान उत्पादनासाठी ज्ञान जेवढे उपयुक्त पडेल.तेवढाच त्याचा वापर करावा हा भांडवलशाहीचा मंत्र आता गतिमान झाला आहे प्रत्यक्ष ज्ञान निर्माण करणाऱ्या संस्था अर्थ करण्याची जोडताना त्यांच्यामध्ये वी संवाद होतो आहे.समाजातील गरजा विद्यापीठातील ज्ञान बाजारपेठेतील गरज आणि ग्राहकांची गरज यामध्ये एक मोठे विसंगतीचे भरलेले वातावरण सर्व क्षेत्रात वाढत आहे. त्यामुळे बदलत्या गरजा बदलते भांडवल बदलते उत्पादन यामुळे सातत्य नाही स्थिरता नाही विक्रीतून मिळणारा नफा हा स्थिर नाही त्यामुळे संचित भांडवलाची वाढ ही गोष्ट होत नाही अनुदानित अर्थसहाय्य सबसिडी यावर उभी राहणारी औद्योगिक क्षेत्र ही स्थिर पायावर उभी राहण्याच्या ऐवजी भांडवल खा भांडवल मोडा, पैसा जोडा, या नवीन भांडवल शाहीच्या दिवाळखोरीकडे मोठ्या प्रमाणात निघाली आहेत.मुळात गुंतवणूक आणि पैसा निर्मिती आणि उत्पादनाच्या मालातून प्राप्त होणारा फायदा या सर्वच बाबी तर्कसंगत दाखवून देता येत नाहीत.

ज्ञान क्षेत्रातील कौशल्यांचा वापर करून नवे उत्पादन नवे बाजारपेठ ताब्यात घेणे हे विकसित राष्ट्राला जागतिक स्पर्धेमध्ये मोठ्या प्रमाणात शक्य होत नाही. हे भारताचे निर्यात दर आणि निर्यात क्षेत्र दाखवून देते त्यामुळे भारतात संचित भांडवल सार्वजनिक बचत क्षेत्रातील पैसा हडप करणे .तो गुंतवणुकीसाठी रोजगार निर्मितीसाठी म्हणून मोठ्या प्रमाणात वापरणे यातून निर्माण होणारा रोजगार हा एक फार मोठा आशा वादाचा प्रकार बनला आहे.भारतीय अर्थव्यवस्था संचित बचत व अनुदानित अर्थसहाय्य यांच्या पायावर औद्योगिक क्षेत्र जगु पाहते आणि त्यातूनच रोजगार निर्मा होतील असा भास तयार केला जातो आहे.हे प्रत्यक्षात दिसताना आढळत नाही आणि त्यामुळे ज्ञानाच्या प्राप्तीकडे ध्येय म्हणून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आकृष्ट होताना दिसत नाही. कालपर्यंत ज्ञानप्राप्ती ही एक आसक्ती होती पण पदव्यांच्या प्राप्तीतून पीएचडी यांच्या संख्येतून भारतीय ज्ञान विश्वात नवकाल्पनिक संशोधकी ज्ञानाचा खडखडात आढळून येतो .जागतिक स्पर्धेतील उपयुक्त ज्ञान नाविन्यपूर्ण ज्ञान गरजाही विषयी जोडलेले संलग्न ज्ञान भविष्यवेधी बदलाच्या अनुषंगिक ज्ञान या ज्ञानाच्या विविध प्रकारांकडे भारतीय ज्ञान निर्माण क्षेत्र पुढे सरकत नसलेले दिसून येते. भारतीय ज्ञान क्षेत्र हे एका बाजूला देशाच्या इतिहासाचे मन पुसून टाकते आहे. देशाला मन असते देशाला इतिहास असतो देशाला भूगोल असतो देशाला भाषा भिन्नत असतात.या सर्वांचा सूक्ष्म संयोजनात विचार करून त्यानुसार अलग अलग धोरणे तयार करणे आणि गरज आणि बाजारपेठ यांच्याशी ती जोडणे हे भारताला ७५ वर्षात जमलेले नाही समान



धोरणे आणि त्यातील अप्रमाणिक अंमलबजावणी ही अर्थव्यवस्थेमधील सातत्याने दोषात्मक वृत्ती आढळून येते .यावर उपाययोजना नाही कठोर कारवाई नाही .शिस्त नाही. नियमावली नाही. अशी अवस्था भारताच्या अर्थकारणात औद्योगिक क्षेत्रात आणि सतत लुटीच्या बाजारपेठेत निर्माण झाली आहे. सर्व क्षेत्रात आज अधपथनाच्या जवळ उद्ध्वस्त डोलाऱ्याच्या नजीक आपण पोहोचलो आहोत हे पण आपण मान्य करत नाही.

ज्ञान निर्माण करणारी विद्यापीठे ही जागतिक स्पर्धेच्या यादीत आहेत आणि येतात असा दावा करतात हा सगळा आत्म परीक्षणाचा विषय आहे ही त्या त्या संस्थांची स्वतःची शासनाची आणि समाजाची घोर फसवणूक आहे असे वास्तवात आढळून येते आहे.

ज्ञान हे एक कौशल्य नाही ज्ञान ही निश्चितता नाही. ज्ञान ही बदलती क्षमता आहे गरजा नुरूप समस्यांच्या उद्भवनुसार त्यावर मात करणाऱ्या अनेक कौशल्यांना ज्ञानाचे आता स्वरूप प्राप्त झाले आहे. ज्ञान ही भाषिकता नाही .ज्ञान हे निव्वळ लेखन नाही.ज्ञान ही केवळ अभिव्यक्ती नाही.ज्ञान हा व्यर्थ् आविष्कार नाही.ज्ञानाच्या या सारख्या अनेक व्याख्या आणि आकलन यापूर्वी होते यावर समाज विश्वास ठेवून वर्तन करत होता त्यानुसार वाटचाल ही करत होता पण आज श्रम आणि उत्पादन भांडवल आणि बाजार ग्राहक आणि जाहिरात यांच्या अन्य संबंधांमध्ये गतिमान अर्थव्यवस्था चालते यामध्ये उपलब्ध काम किती असणार? ते कोणास मिळणार?

याची खात्री कोणत्याच एका घटकाला देता येत नाही. याचे कारण संपूर्ण भांडवलशाहीचे स्वरूप तंत्रज्ञान आधारित निर्माण होऊ लागले आहे. निव्वळ श्रम श्रमिक कष्टकरी शेतकरी शेतमजूर हा कृषी क्षेत्रा शिवाय व सेवा क्षेत्रा शिवाय अन्य क्षेत्रात सामावून घेतला जाऊ शकत नाही आणि त्यामुळे शारीरिक श्रम नाही तर काम नाही अशा विचित्र अवस्थेत सर्व क्षेत्रांमध्ये गतिरोध निर्माण झाला आहे असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत ज्ञाना वरील विश्वास संपुष्टात येऊ लागला आहे. ज्ञानामुळे मानवी सभ्यता प्राप्त करणे ही गरजेचीच बाब नाही इतका रूक्ष विचार पसरतो आहे ज्ञान ही एक संवर्धनाची जतन करण्याची गोष्ट नसून ती विकता येणाऱ्या कौशल्या मध्ये रूपांतरित करता येणारे भान युवकांना प्राप्त होण्याची गरज आहे समाजाच्या असंख्य गरजा आणि त्यासाठीच्या आपल्या ज्ञानाचा उपयुक्त विक्री रूपाने वापर स्वतःला करता येणे ही ज्ञानाची नवी व्याख्या तयार होत्या या ज्ञान विक्रीच्या तंत्र विक्रीच्या कौशल्य विक्रीच्या बाजारपेठेत श्रमाला ही महत्व आहे. हे ओळखून युवकांच्या असंख्य क्षमता निर्माण करणे हे विद्यापीठांना शिक्षण संस्थांना संयोजन करता आले पाहिजे .समाज गरजा समाज बदल समाजातील आंतरिक निर्माण होणारे काळानुरूप बदल त्यासाठीच्या वस्तू गरजा आणि उपयुक्तता यासाठीचा सतत वेध नाविन्यपूर्ण पद्धतीने घेणे व स्वयं कौशल्य आणि साधन निर्मिती करीत राहणे हा आता एक बाजारपेठ संलग्न ज्ञान व्यवहार जो पहिल्यापासूनच आहे. तो आता मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि याच क्षेत्रात ज्ञानाची विक्री होऊ शकते पैसा मिळू शकतो रोजगार मिळू शकतो संधी मिळू शकते नवनिर्माण व्यवस्थेचे याच भांडवला तून याच पद्धतीने तयार करता येऊ शकते. असा आत्मविश्वास देणाऱ्या विद्यापीठ सरचना आज अस्तित्वात नाहीत त्या कॅम्पस मधून औद्योगिक क्षेत्रामधून संलग्नपणे श्रमिक व विद्यार्थी पुरवून अर्थकारण सशक्त करू शकत नाही. औद्योगिक क्षेत्राला गती देऊ शकत नाही उलट शोषणाची जुनी श्रृंखला ते बळकट करीत आहेत आणि त्यामुळे आजचा विद्यापीठातून बाहेर पडलेला अक्षर साक्षर संशोधकीय पेपर सादर केलेला पीएचडी धारक विद्यार्थी ज्ञानार्थी हा निराशेच्या टोकाकडे निघालेला आहे. नैराश्याचा विचार करण्याची गरज कोणत्याच घटकाला वाटत नाही .हे या ज्ञान पर्यावरण वाळवंटाचे दुर्दैव आहे ज्ञान क्षेत्रांमध्ये आस्था बांधिलकी सहानुभूती या जैविक मानवी प्रेरणा ची गरज असते. यातूनच ज्ञानाची संक्रमण अभिवृत्ति वेगाने पुढे जाते संबोधत्मक ज्ञाना निर्मानाल आत्मविश्वास इथेच दिला जातो.

हे बाजारपेठे अनुरूप गरजांच्या साठीचेच ज्ञान हा ज्ञान निर्माणच क्षेत्रातला मोठा धोकाअसून याचा सृजनक्षेत्रावर विपरीत परिणाम होणार आहे. नाविन्य, कल्पना, रचना, वीरचना या अनेक प्रकारच्या ज्ञानाच्या निर्मितीला हे अर्थकारणाशी जोडलेले प्राधान्याचे ज्ञान खूप घातक ठरणार आहे .एकूणच ज्ञान क्षेत्रातील नैराश्य वाढवणारे हे बदल आहेत भारतातील विद्यापीठ महाविद्यालय सर्व पर्यावरण आज संशय भीती नैराश्याने व्यापलेल्या विषमता भेद गरजेपेक्षा जास्त मिळायला पैशामुळे वर्तनच झालेला बदल वेतनातील तफावत आणि विषमतेची प्रचंड मोठी दरी ही सर्वत्र रुंदावत चाललेली आहे.अशा कालखंडातून केवळ मानांकनाची प्रमाणपत्रे ही विद्यापीठांना महाविद्यालयांना कितपत उपयोगी पडणार आहेत समाजातील विद्यार्थी पालक यावर विश्वास कसा ठेवणार हाच खरा प्रश्न आहे?

ज्ञान ही गतिमान गोष्ट आहे ज्ञान ही भविष्यदर्शी गोष्ट आहे ज्ञान ही इतिहासलक्षी बोधविश्लेषणाची गोष्ट आहे ज्ञान ही मूल्य निर्माणच्या श्रद्धांशी संघर्ष करणारी धैर्यवान गोष्ट असते ज्ञानाला निर्भयत असते ज्ञानाला स्वीकृती असते ज्ञानाला मान्यता असते ज्ञानाला भेद नसतो ज्ञानाला विषमता नसते ज्ञानाला उपयुक्ततेचा पाया असतो. ज्ञान ही सत्याकडे जाणारी न्यायाची गोष्ट विकसित करणारी विश्लेषण कारी कार्य गोष्ट असते. ते सौंदर्य असते ती अभिवृत्ति असते ती एक आनंदाची आत्म समृद्ध गोष्ट असते .समाजातील सर्व प्रकारच्या द्वेष हिंसा या अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी धैर्यवान ज्ञानाचा आत्मविश्वास उपयोगी पडतो हे निर्माण कार्य ज्ञानच करीत असते. ती व्यक्तीच ज्ञानी हा वसा पुढे नेत असते म्हणून ज्या समाजात बाजारपेठेची विक्रीशी ज्ञानाचा संबंध सिमित ठेवला जातो. त्या समाजात ज्ञानाच्या मूल्यनिर्माणाचा मानवनिर्माणाचा प्रवास संपलेला असतो तिथे उपयुक्तता टाका फेका वापरा विसरा हा कृतघन जग व्यवहार सुरू झालेला असतो भारतात नव्हे तर जगभर आज वापरा फेका लुटा यासाठी सतत असत त्याने खोटे सर्व क्षेत्रात चालू आहे,आणि भीतीचे साम्राज्य तयार केले म्हणजे या सर्व बाबींचा समाज विचारच करत नाही. जगण्याच्या रोजच्या अस्वस्थ काळजीत तो गुंतून राहतो ज्ञान हिमुठभुरांची शोषण वाद्यांची

मिरास दारी बनून राहते .म्हणूनच कार्पोरेट कॅपिटल अपेटेलिझम हा वंशवाद वाढवतो बाजारवाद वाढवतो ग्राहक वाद वाढवतो, आणि शासन व्यवस्था संकुचित करतो लोकांचे अधिकार शासनाचे अधिकार उध्वस्त करतो असा कार्पोरेट कॅपिटलीझम हा आता संपूर्ण जगाच्या वास्तव्यवस्थांना हिंसेकडे हाकारत नेत आहे. आणि हिंसा आणि द्वेष शोषण आणि संघर्ष तयार करत आहे आणि यातूनच ज्ञानाची निरर्थकता सर्व क्षेत्रात वाढत चाललेली आहे. भविष्याच्या अधिकार मानवाचे अधिकार पृथ्वीच्या अधिकार जीवसृष्टीचे अधिकार हे सगळे उध्वस्त करणे हे क्रॉनी कॅपिटलिझम्म उद्दिष्ट आहे.

एकूणच मानव्य निर्मिती साठीचे ज्ञान सत्याधिष्ठ ज्ञान समाज उपयुक्त ज्ञान श्रम कौशल्याचे ज्ञान ही अवस्था पूर्णता ज्ञान क्षेत्रातील बदललेले आहे. ज्ञानाचीअवस्था भांडवल आणि बाजारपेठेंनी संपूर्ण अवस्थाच बदलून टाकली आहे. अशा वेळेला बदल आकलन आणि बदल स्वीकार बदलानुरूप वर्तनातला बदल आणि ज्ञानाचे बदलते स्वरूप या नव्या ज्ञान बदलाचे आकलन हेच समाजातील सर्व क्षेत्राला सतत गतिमान पद्धतीने करून देणे ज्ञान ही बदलती अवस्था आहे. ज्ञान ही प्रभुत्व शोषणाची आजही अवस्था आहे परंतु वर्ण व्यवस्थेनुसार वंश व्यवस्थेनुसार धर्म व्यवस्थेच्या बहुसंख्यांक वादानुसार ज्ञानाचे बदलते स्वरूप वापर हे अत्यंत सजगपणे करण्याची गरज आहे. सर्वच घटकांनी ज्ञानाची गतिमानता आणि ज्ञानाचे राजकीय स्वरूप आणि भांडवली स्वरूप हे समजावून घेऊन कौशल्यांचे अवकाश निर्माण करणे आणि अर्थकरणाशी बाजारपेठेची त्याची संलग्नता निर्माण करणे हे विद्यापीठांना महाविद्यालयांना नव्या शिक्षण धोरणामध्ये आव्हान पेलावे लागणार आहे.

**लेखक : शिवाजी राऊत (सातारा)**

# लायन्स क्लब च्या वतीने डुबेरे जनता विद्यालयातील मुलींना मोफत सायकल वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी यांच्या वतीने डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप कार्यक्रम मविप्र संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. बाहेर गावाहून विद्यालयात येणाऱ्या मुलींसाठी २० सायकलीचे मोफत वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. लायन्स क्लबच्या सेवा सप्ताह निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लबच्या अध्यक्षा तेजस्विनीताई वाजे होत्या. व्यासपीठावर मविप्र संस्थेचे माजी संचालक व लायन्स हेमंतनाना वाजे , सचिव स्मिता थोरात , खजिनदार प्रतिभा गारे, डॉ. सुजाता लोहारकर , तृप्ती काळे, संगीता वाजे, वैशाली सानप , संगिता कट्यारे,डॉ अरुण थोरात, निमाचे सचिव बबन वाजे, सोपान परदेशी, सुरेश कटयारे, डॉ.प्रशांत गाढे, पी.आर. वारुंगसे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने ,मुख्याध्यापक रामदास वाजे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्येची देवता सरस्वती मातेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या मनोगतातून हेमंत नाना वाजे यांनी लायन्स क्लब राबवित असलेल्या विविध उपक्रमाविषयी माहिती दिली.



यावेळी बोलताना कार्यक्रमाच्या अध्यक्षा तेजस्विनी वाजे म्हणाल्या की , विद्यार्थिनींना शाळेत येण्या जाण्याची सोय व्हावी यासाठी लायन्स क्लब च्या वतीने मोफत सायकल वितरण करण्यात आले . ही योजना रिसायकल बँक योजना असून दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुन्हा ही सायकल विद्यालयात जमा करावी. या सायकलचा उपयोग याच शाळेत शिकणाऱ्या इतर विद्यार्थिनींसाठी केला जाईल असे त्या म्हणाल्या. या उपक्रमासाठी लायन्स हेमंत वाजे, बबनराव वाजे,जयवंत काळे ,सुरेश कट्यारे यांनी अर्थसहाय्य केले.या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमाचे मविप्र संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे,तालुका संचालक कृष्णाजी भगत,श्रीमंत बाजीराव पेशवे पतसंस्थेचे चेअरमन नारायण वाजे, विठ्ठलतात्या वामने आदींनी कौतुक केले आहे.

यावेळी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक बी.एम. पवार यांनी विद्यार्थ्यांच्या बक्षिस योजनेसाठी पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली.तसेच इंग्रजी विषयात उत्कृष्ट यश मिळविलेल्या सहा विद्यार्थ्यांना इंग्रजी डिक्शनरीचे वाटप केले. यावेळी श्रीमंत पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरूण वारुंगसे,अशोकराव गवळी, शालेय समितीचे सदस्य शंकरराव वामने ,भाऊ रखमा वारुंगसे, रामनाथ पावसे, वसंतराव जाधव ,शरद माळी ,विजय वाजे, दामोदर कुंदे, गणेश वाजे , सोमनाथ वारुंगसे, प्रवीण वामने,अर्चनाताई ढोली, चित्रा पडवळ, माधुरी ढोली आदींसह लायन्स क्लबचे सदस्य,शालेय समिती सदस्य, पालक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर. करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

# भाजप महायुती ला महाराष्ट्राच्या सत्तासिंहासनावर पुन्हा बसविण्याची ताकद माझ्या रिपब्लिकन पक्षात

(पान १ वरून..)

ना.रामदास आठवले बोलत होते.

ना. रामदास आठवले म्हणाले की, मी केंद्रात तिस-यांदा मंत्री झाल्यामुळे माझे राज्यभर अनेक सत्कार सोहळे झाले. परंतु बीड जिल्हयाचे पप्पु कागदे यांनी माझा सत्कार सोहळा भव्य दिव्य केला. बौध्द, मातंग ,चर्मकार, मराठा, मुस्लिम समाजाला न्याय देण्याचे काम करणारे आम्ही आहोत. संविधानासाठी गोरगरीब समाजासाठी व उपाशी पोटी राहणाऱ्या माणसांसाठी आम्ही काम करणारी माणसे आहोत. दलित पँथरपासुन बीड जिल्हा माझा बालेकिल्ला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे ही माझी मागणी दलित पँथरपासुन आहे. मंडल आयोग लागु करण्यासाठी संघर्ष करण्याचे काम मी पॅथरच्या माध्यमातुन केले आहे. नामांतराच्या लढयात गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांचे मोठे योगदान होते. मराठा समाजाच्या पाठीशी आम्ही आहोत. भाजपाने रिपाइंच्या राज्यभरातील ताकदीचा विचार करुन भाजपाने आम्हाला सत्तेत वाटा दिला पाहिजे. भाजपला सत्तेत यायचे असेल तर रिपाइंला ११ जागा देऊन त्यात केज मतदार संघाची जागा द्यावी. मराठा समाजाला आरक्षण मिळवुन देण्यासाठी दिवंगत विनायकराव मेटे यांनी सदैव संघर्ष केला. बीड जिल्हयात आल्यावर गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. पप्पु कागदे सारख्या देशभरातील कार्यकर्त्यांची माझ्या पाठीशी ताकद आहे. त्यामुळे केज चा रिपब्लिकन पक्षाचा आमदार करण्यासाठी मी ताकद लावणार आहे. असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

या भव्य सत्कार सोहळयाचे स्वागताध्यक्ष युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे म्हणाले की, दिन दलित, शोषित, पिडीत, उपेक्षितांना न्याय देण्याचे काम ना. रामदास आठवले दलित पँथरपासुन करीत आहेत. मराठवाडा विद्यापीठ नामांतर, मंडळ आयोगाचा लढा उभा केला. ओबीसींना न्याय देण्याचे काम रिपाइंच्या माध्यमातुन करीत आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याची भुमिका रिपब्लिकन पक्षाची आहे.

केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांचा बीड शहरात शनिवारी ऐतिहासीक सत्कार सोहळा पार पडला. सोहळयापूर्वी राजुरीवेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य - दिव्य रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी निळया वादळाचे शक्ती प्रदर्शन केले. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या तगडया नियोजनातुन ना. रामदास आठवले यांचा बीड येथील भव्य दिव्य सोहळा ऐतिहासीक ठरला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### घरातून दागिन्यांसह रक्कम पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने,चांदीचे पैंजण,रोख रक्कम व गोल्डन कंपनीची घड्याळ असा मिळून तीन लाख तीस हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.२ ऑगस्ट २०२४ ते २८ सप्टेंबर २०२४ दरम्यान शिवाजीनगर मोदीखाना येथे घडली.याप्रकरणी शकीला अब्दुल हफिज शेख (वय-६८,रा.शिवाजीनगर,मोदी खाना) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास मसपोनि.केंद्रे या करीत आहेत.

### दहिटणे सर्व्हिस रोडवर अपघात ; दुचाकी चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) दहिटणे सर्व्हिस रोड येथील वक्रतुंड हेअर सलूनच्या दुकानासमोर दुचाकी वाहन क्रं. एम एच.१३.बीएच.०३५१ ही दुचाकी महादेव अंबादास जतकर (वय-६१,रा.दहिटणे) यांनी अतिवेगाने चालवून फिर्यादी फरीस युनससो रेड्डी (वय-२७,रा.विडी घरकुल) यांचे वडील युनससो रेड्डी (वय-५६) यांना जोराची धडक देऊन गंभीर दुखापत केली.तसेच स्वतः जखमी होऊन दुचाकी वरील मागे बसलेला नवनाथ गव्हाणे याला देखील जखमी करण्यास कारणीभूत ठरला आहे.अशा आशयाची फिर्याद फरिस रेड्डी याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्याच्या फिर्यादीवरून महादेव जतकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना ३ ऑक्टोंबर रोजी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेचा पुढील तपास पोसई.येडे हे करीत आहेत.

### सलगर वस्ती येथील घरातून रक्कम पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) राहत्या घराचा दरवाजा ढकलून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत घरातील लाकडी टेबलावर ठेवलेली सामानाची लोखंडी ट्रक व त्यातील रोख रक्कम ३० हजार रुपये चोरून नेल्याची घटना ३ ऑक्टोंबर रोजी सर्वसुखी नगर येथे सकाळी नऊ ते रात्री सात वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी लक्ष्मी विठ्ठल मस्के (वय-३५,रा.सर्वसुखी नगर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक जाधव हे करीत आहेत.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते आज मंगळवेढयात अकराशे कोटींच्या विविध विकास कामांचा शुभारंभ

## मंगळवेढेकरांसाठी सुवर्ण दिन; आ आवताडेंच्या प्रयत्नांतुन २४ गाव उपसा सिंचन योजनेचे काम आजपासून सुरू होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील बहुचर्चित असलेल्या सुमारे ७०० कोटींच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ आज दि ७ ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव-दहिवडी रस्त्यावरील लक्ष्मीदेवी टेकावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमास पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील उद्योग मंत्री उदय सामंत जलसंधारण मंत्री संजय राठोड सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी केले आहे.

**मंगळवेढा उपसा सिंचन योजना (७०० कोटी) पंढरपूर एमआयडीसी, तामदर्डी बंधारा (३५ कोटी), उपजिल्हा रुग्णालय मंगळवेढा(१०० कोटी) व कर्जाळ कात्राळ ते नॅशनल हायवे पर्यंतचा रस्ता (२०० कोटी) या विकास कामांचेही उद्धाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.**

गेल्या अनेक वर्षापासून राजकारणात कळीचा व शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा मुद्दा ठरलेल्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला १३ मार्च २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मंजुरी मिळाली होती मात्र या मंजुरीनंतर या अगोदर दोन वेळा मंजुरी मिळाली आहे,हे केवळ राजकारणासाठी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मंजुरी देऊन लोकांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे अशा टीका विरोधकांनी केल्या होत्या मात्र मंजुरीच्या दुसऱ्याच दिवशी टेंडर पब्लिश करत सरकारने विरोधकांना चपराक दिली होती त्यामुळे काही दिवसातच या योजनेचे काम सुरू होईल असा विश्वास दुष्काळी भागातील जनतेला वाटू लागला होता तो दिवस उजाडला असून प्रत्यक्षात या योजनेच्या कामाला सुरुवात होणार आहे .

पोट निवडणुकीमध्ये पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमधून समाधान आवताडे यांना निवडून द्या महाविकास आघाडी सरकारचा करेक्ट कार्यक्रम करून मी मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मंजुरी देतो असा शब्द तत्कालीन विरोधी पक्षनेते तथा सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवेढा येथील सभेत मंगळवेढेकरांना दिला होता त्या शब्दावर विश्वास ठेवून मंगळवेढेकरांनी समाधान आवताडे यांना आमदार केले त्यानंतर देवेंद्र फडणीस यांनी सरकारचा करेक्ट कार्यक्रम ही केला आणि अवताडे यांच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या पाठपुराव्याची दखल घेत बुधवार १३ मार्च २०२४ च्या झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ६९७.५१ कोटीच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस विना अट मंजुरी देत मंगळवेढेकरांना दिलेला शब्द फडणवीस सरकारने पूर्ण केला होता त्यावेळी मंगळवेढा तालुक्यातून फटाके फोडून व पेढे वाटून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. तर विरोधकांकडून या अगोदरही अशी मंजुरी मिळाली होती यात नवीन काय? असं म्हणत या मंजुरीची खिल्ली उडवली जात होती मात्र पहिल्या टप्प्यातील १११ कोटीच्या कामाचा शुभारंभ होत असल्याने विरोधकांना टीका करण्यासाठी शब्द सुचेनासे झाल्याचे चित्र दिसत आहे .



पहिल्या टप्प्यात पंप हाऊस बांधकाम करणे,उर्ध्वगामी नलिका क्रमांक एकचे काम सुरू करणे, शेलेवाडी येथे वितरण कुंड तयार करणे,या कामाचा समावेश आहे त्यामुळे नुसत्या मंजुऱ्या देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा धंदा राजकारण्यांनी मांडला आहे असे म्हणणाऱ्यांना एक प्रकारे चपराक बसली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज होणाऱ्या या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी आमदार समाधान आवताडे यांच्या टीमकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे.

या कार्यक्रमासाठी खा.ओमराजे निंबाळकर, खा.धैर्यशील मोहिते पाटील, खा.प्रणिती शिंदे, आ.अरुण लाड, आ. सुभाष देशमुख, आ.राजेंद्र राऊत, आ.यशवंत माने, आ.रणजितसिंह मोहिते पाटील, आ.विजयकुमार देशमुख, आ.संजय मामा शिंदे, आ. शहाजी बापू पाटील, माजी आ.प्रशांत परिचारक, आ जयंत आसगावकर, आ.बबनदादा शिंदे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.राम सातपुते हे उपस्थित राहणार आहेत.

# रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी सुर्यकांत वाघमारे यांची नियुक्ती : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई/प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि लोणावळयाचे माजी नगराध्यक्ष सुर्यकांत वाघमारे यांना रिपब्लिकन पक्षाने पदोन्नती दिली असुन रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी सुर्यकांत वाघमारे यांची अधिकृत निवड करण्यात आल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली.



रिपब्लिकन पक्षाचे नवनियुक्त महाराष्ट्र प्रदेश सचिव सुर्यकांत वाघमारे यांचे रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे, राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाचा रिपब्लिकन पक्षाने ठरवुन दिलेला कारकिर्दीचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा देवुन पक्षाचा आदेश पाळण्याचा पक्षशिस्तीचा आदर्श नमुना सुर्यकांत वाघमारे यांनी घालून दिला आहे. अनेक पदाधिकारी एकाच पदावर अनेक वर्षे जागा अडवुन राहतात. पदाला चिकटून राहतात. पदाचा कालावधी संपला तरीही पद सोडत नाहीत. अशा काळात सुर्यकांत वाघमारे यांनी पक्षाने आपल्याला ठरवुन दिलेला कालावधी पुर्ण झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाचा स्वतः राजीनामा देवून एक आदर्श घडवला आहे. सुर्यकांत वाघमारे यांचे शिस्तबद्ध काम आणि यशस्वी कामगिरी पाहुन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सुर्यकांत वाघमारे यांची रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती केली आहे तसेच त्याचवेळी रिपब्लिकन पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी सातारा जिल्हयाचे अशोक गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे असे रिपब्लिकन पक्षातर्फे अधिकृत जाहीर करण्यात आले आहे.

# उप सभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी) : राज्याच्या विधान परिषदेच्या मा.उप सभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या वतीने नवरात्र महोत्सवानिमित्त भाविकांसाठी करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती व्यवस्थापक श्री.मनोज श्रोत्री यांनी दिली.

# सिमा मडिखांबे यांना आदर्श गुणवंत शिक्षिका पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : अंबरनाथ येथे गुणवंत आदर्श शिक्षिका आयुष्यमती सिमा गौतम मडीखांबे यानां प्रदान करण्यात आला अबंरनाथ येथे जावसई गुरुकुल इंग्रजी हायस्कुल मध्ये कार्यरत असलेले आयुष्यमती सिमाताई गौतम मडिखांबे यानां आदर्शगुणवंत शिक्षिका पुरस्कार विद्यमान माननिय आमदार बालाजी किणीकर अंबरनाथ विधासभा जि.ठाणे यांच्यां हस्ते. महात्मा गांधी विद्यालय. येथे प्रदान करण्यात आला यावेळी शिक्षक मतदार संघं ज्ञानेश्वर म्हात्रे हे यांच्या उपस्थित हा सोहळा संपन्न झाला यावेळस मुख्याद्यापक शिक्षक शिक्षिका आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




# अखिल भारतीय छावा संगठनेचे युवक जिल्हा अध्यक्ष माने यांचे अमरण उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी

उमरगा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी कार्यलय समोर गेली ४दिवस झाले अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब माने हे अमरण उपोषण करत आहेत. चार दिवसापासून उन वारा पाऊस याची तमा न बाळगता त्यांचे अमरण उपोषण सुरु आहे. पण याची आत्तापर्यंत शासनाणे दखल घेतली नसल्याने नागरिकात संतापाची लाट उसळत असल्याचे चित्र दिसत आहे. माने यांच्या मागण्या रास्त आहेत असे नागरिक म्हणत आहेत. माने यांनी शेतकऱ्याच्या सोयाबीन पिकाला ८५००भाव मिळावा महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्याचे कर्ज माफ झाले पाहिजे, माकणीचे मंडळ अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावं, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट काम लवकरात लवकर पूर्ण करावं, तुरोरी गावच्या सांडव्याचे पाणी गळती कायम स्वरूपी थांबवावी, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ज्या मराठा बांधवानी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्यांना न्याय मिळावा. अशा त्यांच्या काही प्रमुख मागण्या आहेत.



# महात्मा गांधीजींचे स्वच्छता हीच सेवा तत्व आत्मसात करा : मलकप्पा भरमशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनीधी : महात्मा गांधीजींनी स्वच्छता ही सेवा हे तत्व सांगून मानवतेचा उद्धार केला आहे, परंतु अलीकडील काळात समाजाने या तत्त्वाकडे दुर्लक्ष केल्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी परत एकदा स्वच्छता हीच सेवा हे तत्व आत्मसात केली पाहिजे, असे प्रतिपादन आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता हीच सेवा हा उपक्रम आयोजित केला होता त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, कार्यक्रमाधिकारी राजशेखर पवार, कार्यक्रमाधिकारी प्रा शितल झिंगाडे-भस्मे उपस्थित होते




कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा राजशेखर पवार म्हणाले की, केंद्र सरकारच्या खेळ मंत्रालयाने भारत पोर्टल उपक्रमांतर्गत स्वच्छता ही सेवा या तत्त्वानुसार देशभरातील काही महाविद्यालयांची निवड केली आहे. त्यामध्ये कल्याणशेट्टी महाविद्यालय अव्वल ठरले आहे. रा से यो च्या स्वयंसेवकांनी प्लास्टिक वस्तू, बाटल्या, ओला, सुका केरकचरा गोळा केला आहे. महाविद्यालय व शहरातील परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याबद्दल नागरिकांनी महाविद्यालयाचे भरभरून कौतुक केले आह.

कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाधिकारी प्रा शितल झिंगाडे- भस्मे यांनी आभार मानले.

ॅया अभिनव उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, सेमी विभागाचे दिगंबर जगताप यांनी कौतुक केले.

**मंगळवारी होम मैदान येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण वचनपूर्ती सोहळ्याचे आयोजन**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती**

# जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला लाभार्थ्यांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी होम मैदान येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला लाभार्थी उपस्थित राहावेत यासाठी साडेतीनशे पेक्षा अधिक बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधित महिला लाभार्थ्यांनी या सोहळयाला उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

### होम मैदान येथील कामांची पाहणी

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी होम मैदान येथे मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याच्या तयारीची पाहणी केली. येथे ४० हजार महिला लाभार्थी बसू शकतील असा सभा मंडप तयार करण्यात येत आहे, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देणारे स्टॉल हे लावण्यात येणार आहेत, या कामाची प्रत्यक्ष पाहणी तसेच आवश्यक सूचना त्यांनी यावेळी संबंधित शासकीय यंत्रणा व गुत्तेदार यांना दिल्या. तसेच प्रत्येक तालुक्यातून येणाऱ्या बसेस साठी व अन्य वाहनासाठी पोलीस विभागाच्या वतीने शहरात ठीक ठिकाणी तयार केलेल्या पार्किंग ची माहिती ही त्यांनी घेतली. एकाही महिला लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून त्याचा आढावा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी घेतला.**

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची राहणार आहे. दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी सोलापूर शहरातील होम मैदान येथे दुपारी १२:३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला लाभार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे. असे आवाहन त्यांनी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस उपयुक्त दिपाली काळे, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख सदाशिव पडदूने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.



## थोडक्यात

### उल्हासनगर येथे रंगणार आंबेडकरी साहित्य संमेलन

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आंबेडकरी साहित्याची जनजागृती व्हावी, त्या विषयी महत्व कळावे व नवीन कवींना, साहित्यिकांना विचारमंच उपलब्ध व्हावा व आंबेडकरी साहित्याच्या माध्यमातून समाज प्रबोधन व्हावे म्हणून रविवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सेवा संस्था यांच्या वतीने राज्यस्तरीय एकदिवसीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन उल्हासनगर येथे करण्यात आले आहे. या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सदधम्म पत्रिकाकार प्रा. आनंद देवडेकर असणार आहेत. तर स्वागताध्यक्ष समाजसेवक सारंग थोरात आहेत. या एकदिवसीय आंबेडकरी साहित्य संमेलनात दोन परिसंवाद, कथाकथन, नाटक, भव्य कविसंमेलन होणार आहे. तरी बहुजन समाजातील लेखक, कवी आणि साहित्य प्रेमीनी सहभागी होऊन साहित्य आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन मुख्य संयोजक बी. अनिल तथा अनिल भालेराव यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी ९८६०१३३९५० यावर संपर्क करावा.

### दुचाकी-चारचाकी वाहनाच्या अपघातात महिलेचा मृत्यू

सोलापूर : दुचाकी-चारचाकी कार वाहनाच्या अपघातात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ६ सप्टेंबर रोजी जुना पुना नाका हायवे वरील ब्रिजवर घडली.याप्रकरणी सागर बजरंग कराळे (वय-३५,रा. राजगुरुनगर,शिरोली रता खेड,जिल्हा. पुणे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून शिवानंद जगदेव कुंभार (रा. सुशील नगर,विजापूर रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे चार चाकी वाहन क्रमांक एमएच.१४.जेयू.९७९८ यामधून पुण्याकडे जात असताना जुना पुना नाका ब्रिजवरील हायवे रस्त्यावर आले असता,त्यावेळी विरुद्ध दिशेने शिवानंद कुंभार हा चालवत असलेला दुचाकी क्रमांक एमएच.१३.एआर.९८०८ यावर त्यांची पत्नी रूपाली शिवानंद कुंभार व मुलगी श्रद्धा शिवानंद कुंभार यांना बसवून निष्काळजीपणाने वाहन चालवत फिर्यादी यांच्या चार चाकी कारला धडक देऊन नुकसान केले व तसेच स्वतः जखमी होऊन पाठीमागे बसलेली त्यांची पत्नी व मुलगी हिला जखमी करून पत्नी रूपाली कुंभार यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेप्रकरणी ५ ऑक्टोंबर रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करीत आहे.

# माढा मतदारसंघात विकासाचा धुरळा उडवू : अभिजीत पाटील

## २ ११,१११ प्रथम बक्षीस बैलगाडा शर्यतीचे ठरले मानकरी नाथसाहेब प्रसन्न मोहेल शेठ धुमाळ व पै.तेजस भैय्या पाटील






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर

माढा विधानसभा मतदारसंघात विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सामाजिक कार्यक्रमांच्या धडाका लावला आहे. शनिवारी बावी येथे ओपन बैलगाडा शर्यतीच्या मैदानाने मोठी धमाल केली. सुमारे दहा हजार बैलगाडा शर्यत शौकिनांनी या कार्यक्रमास हजेरी लावल्याचे दिसून आले. बैलगाडा शर्यतीतील बैलांनी अक्षरशः धुरळा उडवून दिला. यावेळी अभिजीत पाटील यांनी नागरिकांनी पाठीशी उभे राहिल्यास या मतदारसंघात विकास कामांचा धुरळा उडवून देऊ. आजपर्यंत स्पर्धकच शर्यतीत उतरला नव्हता. आता जशास तसे उत्तर देणारा स्पर्धक मैदानात उतरला आहे अशी बोचक टिका केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी माढा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी या मतदारसंघात पाय रोवल्याने, कार्यक्रमांचा धडाका उडवून दिल्याने, या मतदार संघातील लढत मोठी चुरशीची होण्याची चिन्हे निमर्ाण झाली आहेत. आ. बबनदादा शिंदे हे महायुतीत असताना, त्यांनी राष्ट्रवादीप्रमुख शरद पवार यांच्याशी संधान बांधणे सुरू केले आहे. एवढ्यावरच न थांबता, शरद पवार यांनी उमेदवारी न दिल्यास अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणाही केली आहे.

विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी मागील काही महिन्यांपासून, माढा तालुक्यात तळ ठोकला आहे. माढा केसरी कुस्ती स्पर्धा, माढा केसरी बैलगाडा शर्यत, महिलांसाठी खेळ मांडियेला यासारख्या विविध

### माढा तालुक्यातील बावी येथे ओपन बैलगाडा शर्यतीचा उडाला धुरळा

कार्यक्रमांचा धडाका उठवला आहे. शेतकऱ्यांना ऊसचा दर वाढवून देण्यात अभिजीत पाटील यांचाच मोठा वाटा असल्याची चर्चा शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे.

माढा केसरी २०२४ बैलगाडा शर्यतीने त्यांनी शेतकरी वर्गाची मने जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. बावी येथे भरवण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीच्या समारोपप्रसंगी त्यांनी नागरिकांना संबोधित केले. शेतकऱ्याचा मुलगा चेअरमन झाल्यावर काय फायदा होतो, हे शेतकऱ्यांना कळले आहे. चेअरमनचा मुलगा चेअरमन झाल्यास कारखान्याची कशी वाट लागते, हेही शेतकऱ्यांनी पहिले आहे. आता शेतकऱ्यांच्या मुलाला आमदार करण्याची संधी नागरिकांना आली आहे. नागरिकांनी संधी दिल्यास माढा तालुक्याचा सर्वांगिणक विकास करून दाखवणार असल्याचे सांगितले. या तालुक्यात विकासाचा धुराळा उडवून देऊ, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रथम क्रमांक नाथसाहेब प्रसन्न मोहेल शेठ धुमाळ व पै.तेजस भैय्या पाटील व दुसरा क्रमांक सेवागिरी प्रसन्न सोहम जगदीश बापू शिंदे उरळी तर तिसरा क्रमांक पै.विराज नानासाहेब पिसे पठारवाडी शिरवळ, चौथा क्रमांक बडेबाबा प्रसन्न शिवांश तुषार घोरपडे सरकार पनवेल तसेच पाचवा क्रमांक अतुल नाना सुर्वे मोडनिंब भारत प्रेमी तर सहावा क्रमांक सरपंच रामभाऊ पांढरे शिर्डी संभाजी गीते पिंपरीकर तर सातवा क्रमांक मॉ तुळजा भवानी प्रसन्न सर्वज्ञा अमोल दादा गायकवाड वडकी यांनी विजय खूचून आणत गुलालाची उधळण करत रोख पारितोषिक मिळवली.

**माढा तालुक्यातील विधानसभा निवडणुकीमुळे वातावरण पुरते ढवळले आहे. विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी या निवडणुकीत रस दाखविल्यामुळे, दोन्ही साखर सम्राट एकमेकांविरोधात उभे राहत असल्यामुळे, या मतदार संघातील लढतीकडे सबंध जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.**

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक सरस्वती माता पोषाखासह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी) : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे चौथ्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस सरस्वती माता पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, नाम निळाचा कौस्तुभ मणी, हिऱ्याचे कंगन, दंडपेठ्या, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स जोड, तोडेजोड, अष्टपैलू मण्यांची कंठी, चंद्रहार, पैंजण जोड, लॉकेट, मोहन माळ, मारवाडी सोन्याचा करदोडा, नऊ पदरी लॉकेट, पाच पदरी चंद्रहार, पट्टीचे लॉकेट, चार पदरी चंद्रहार, तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, जडपाचा हार, बाजूबंद जोड, खड्याची वेणी, चिंचपेटी हिरवी, हात सर जोड, पानाड्याचा हार, तनमई मोठा, मोरजोड, सोन्या मोत्याचे ताणवड, चंद्र, बाजीराव गरसोळी, खड्याची बिंदी, मोत्याचे मंगळसूत्र, रुळजोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, वाक्या जोड, तोडेजोड * तसेच राधिका मातेस नक्षी टोप, लक्ष्मी हार, जवा मनी पदक, चिंचपेटी तांबडी, मोरांची माळ, जव्याची माळ व सत्यभामादेवीला नक्षी मुकुट, जव्याची माळ



, हायकोल, पुतळ्याची माळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे. सदरची सविस्तर माहिती विविध समाज-माध्यमांतून प्रसिध्द होत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे. नवरात्र उत्सवातील सर्व प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# कळंब येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील कळंब गावी, प्रविणभैय्या माने यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले. रविवार दिनांक ६ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात असंख्य नागरिकांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली.

सकाळी १० वाजता सुरू झालेल्या शिबिरात आत्तापर्यंत ८७२ लोकांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली असून यापैकी ४२७ नागरिकांना चष्म्याचे वाटप करण्यात आले असून १६ नागरिकांची पुणे येथील भारती हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रीया पार पडणार आहे.

या शिबिरास भेट दिल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना, गेल्या ५ - ६ दिवसांत सर्वत्र नागरिकांनी ज्या पद्धतीने प्रतिसाद दिला आहे यानिमित्ताने श्री माने यांनी संपूर्ण तालुक्यातील नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

या शिबिराचे आयोजन गणेश धांडोरे, विशाल वाघमोडे, संतोष कदम सर, अमोल चव्हाण यांनी केले होते तर निलेश रंधवे, छगन बनसोडे, अंकुश दोरकर, डॉ. शरद शिर्के, तमन्ना मॅडम, डॉ. संतोष रणवरे यांनी या शिबिराचे नियोजन केले.

तर या कार्यक्रमाच्या निमित्ताने राजेश जामदार, गणेश धांडोरे, अमोल चव्हाण, संतोष कदम सर, विशाल वाघमोडे, समाधान माळशिकारे, सागर डोंबाळे पाटील, सोमनाथ पवार, महेश डोंबाळे पाटील, विजय महाडिक, पांडुरंग जगदाळे, ओम चव्हाण, विशाल जाधव, आदित्य कांबळे, सुजित पाटील, सिद्धार्थ मोरे, विशाल भोसले, वैभव करवले, रोहन बनसोडे आदी मान्यवर आणि पत्रकार बांधव यावेळी उपस्थित होते.

# महंतेश्वर कट्टीमनी यांना शेखर राज्य पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील मींदर्गी कन्नड प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महंतेश्वर कट्टीमणी यांना धारवाड येथील डॉय फाऊंडेशनतर्फे राज्य पुरस्कार-२०२४ चे कोडमडा शेखर यांनी सन्मानित केले. प्रमुख गुरु महंतेश्वर कट्टीमनी यांना डोई फाउंडेशन, धारवाड तर्फे ''शेखर राज्य पुरस्कार-२०२४'' देऊन गौरविण्यात आले. डॉ. मल्लिकार्जुन आगलावाडी, पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. सिथवा जोदत्ती, फाउंडेशनचे संस्थापक सदस्य आहेत.

१ ऑक्टोबर रोजी धारवाड येथील इंसिरा औरा ज्युबिली सर्कल येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. शेखर अप्प्या नायकर यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध राज्यातील १० यशवंतांना कलबुर्गी सीयूकेचे कुलपती डॉ. मल्लिकार्जुन आगलावाडी, पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. सिथवा जोदत्ती, शारव दारोजी, गंगा यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. महांतेश कट्टीमणी यांनी मुख्याध्यापक म्हणून कन्नड शाळा वाचवण्याच्या आणि विकसित करण्याच्या कामात स्वत:ला झोकून दिले असून, काही महिन्यांपूर्वी त्यांनी आपल्या शाळेतील मुलींना विमानाने प्रवास करून महाराष्ट्रातच नव्हे, तर कर्नाटकातही बातमी दिली. काही दिवसांपूर्वी त्यांनी स्थानिक गरीब पालकांना स्वखर्चाने धार्मिक स्थळांना भेट देऊन पुन्हा चर्चेत आणले. इतकेच नव्हे तर शाळेचा दर्जा वाढविण्यासाठी ते अथक परिश्रम घेत असून, धारवाडच्या डोई फाऊंडेशनने त्यांना ओळखून हा पुरस्कार दिला, त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे. याबाबत विकडशी बोलताना



मुख्याध्यापक महांतेश कट्टीमणी यांना धारवाडच्या डोई फाऊंडेशनने त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार दिल्याने खूप आनंद झाला, ज्यामुळे त्यांना आणखी काम करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी केलेल्या कामाला सर्वोत्कृष्ट पाठबळ मिळाल्याने कौतुक आणि पुरस्कार मिळून त्यांना आणखी प्रेरणा मिळेल. सीमाभागातील कन्नड शाळा वाचवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले, कर्नाटकातील संस्थांनी महाराष्ट्रात जे काम केले आहे, ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

### स्वेरीच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत

### 'मेसा' चा स्तुत्य उपक्रम

# स्वेरी मध्ये 'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त स्वेरीमध्ये'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत स्वेरी संचालित इंजिनिअरिंग व फार्मसीच्या पदवी व पदविका तसेच एमसीए व एमबीए या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या वाहनांना एक दिवस सुट्टी दिली. स्वेरीच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.





स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे व प्रा. पूजा रोंगे हे 'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' असल्यामुळे गेंड वस्तीपासून ते ठाकरे चौकापर्यंत चालत आले. तेथून स्वेरी कॉलेज पर्यंत बोलेरो या वाहनाने आले. डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ व त्यांचे इतर प्राध्यापक वर्ग सायकलवरून, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर व इतर प्राध्यापक हे एस.टी. ने कॉलेजला आले. तर स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार हे ऑटो रिक्षाने महाविद्यालयात पोहोचले.

एकूणच स्वेरीचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारीसहित सर्व स्टाफ यांनी स्वतःच्या वाहनाला सुट्टी दिली होती. यामुळे स्वेरी कॅम्पस मध्ये देखील वाहनांची वर्दळ नव्हती. यामध्ये काही प्राध्यापक रिक्षा, बस आदी वाहनांनी तर कांही प्राध्यापक चक्क चालत कॉलेजला आले. प्राध्यापक वर्ग बसमधून, सायकल वरून कॉलेजच्या प्रवेश द्वाराजवळ येताच विद्यार्थी गुलाब पुष्प देवून त्यांचे स्वागत करत होते. एकूणच दर वर्षीप्रमाणे यंदाही 'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' यशस्वीरित्या साजरा करण्यात आला. स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील मेसा (मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडन्ट असोसिएशन) मधील विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने हा एकदिवसीय 'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' साजरा केला. या उपक्रमाचे पंढरपूर परिसरात व सर्वत्र कौतुक होत आहे.

**इंधनाची बचत आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या हेतूने आज 'मेसा' मधील विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने 'नो प्रायव्हेट व्हेईकल डे' या अभियानाचे आयोजन केले होते. यामध्ये संस्थेअंतर्गत असणाऱ्या सर्व सदस्यांनी एक दिवस खाजगी वाहनाशिवाय प्रवास करण्याचा आनंद लुटला. एकूणच मेसाच्या विद्यार्थ्यांची ही संकल्पना स्वागतार्ह आहे.**

**- स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे**

# नवरात्र संगीत महोत्सव; भारतरत्न भिमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांनी जागवल्या आजोबांच्या आठवणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रा निमित्त श्री संत तुकाराम भवन येथे संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहेत. त्यामध्ये संगीत महोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे दि.०४ ऑक्टोंबर रोजी भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी यांचे नातु विराज जोशी, पुणे यांचा अभंग वाणीचा कार्यक्रम संपन्न झाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.




कार्यक्रमाच्या सुरवातीला मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री व विराज जोशी यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी गायक श्रीनिवास जोशी, शिल्पा जोशी, विभाग प्रमुख राजेश पिटले, संजय कोकीळ, सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी व संदीप कुलकर्णी उपस्थित होते.

प्रतिवर्षाप्रमाणे रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाची पहिलं स्वरपुष्प भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांनी गुंफले. शास्त्रीय गायनामध्ये राग शुध्द कल्याण गात अभिजात शास्त्रीय संगीताचा दमदार वारसा चालवणार याची रसिकांना खात्री पटली. त्यानंतर वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र जय राम कृष्ण हरी ने सुरुवात करत आजोबा भारतरत्न भिमसेन जोशी यांनी स्वरबद्ध केलेल्या प्रसिद्ध संतरचना त्यामध्ये आता कोठे धावे मन. माझा भाव तुझे चरणी, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल. जय दुर्गे दुर्गती परिहारीणी, भाग्यदा लक्ष्मी बारंम्मा, जे का रंजले गांजले, अणुरणीया थोकडा आदी संतरचना गाऊन शेवटी अगा वैंकुठीच्या राजा या भैरवीने आजोबा भारतरत्न भिमसेन जोशी यांच्या आठवणी जागवल्या व सर्व रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाला तबला पांडुरंग पवार, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम ओंकार पाठक व टाळ अक्षय सरदेशमुख यांनी वाजवला. सदरचे कार्यक्रम मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येत आहेत. नऊ दिवस चालणाऱ्या या संगीत महोत्सवात ख्यातनाम गायक - गायिका यांची उपस्थिती असणार असून, सर्व रसिक श्रोत्यांनी लाभा घ्यावा असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केले.